# विद्याभारती, कोंकण मुंबई

(नोंदणी क्र. : महा. राज्य. मुंबई १११७/ २००६ जी.बी.बी.एस.डी.)

द्वारा: राष्ट्रीय शिक्षण व संशोधन संस्था, यशवंत भवन, पांडूरंग बुधकर मार्ग, परळ, मुंबई - ४०० ०१३.

संपर्क पत्ता: प्लॉट क्र. २४५, वसंतश्री अपार्टमेंट, कानसई विभाग, एएमपी गेट जवळ, अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१.

ई-मेल : vidyabhartikokanmumbai@gmial.com / vbkmumbai20@gmail.com

Pan No.: AABTV01975


जावक क्र: विकोमु/५७/२०२५-२६ दिनांक:-२० मार्च २०२६

प्रति,

मां.अध्यक्ष /कार्यवाह

-------------------------

-------------------------

विषय:- पायाभूत सत्र अभ्यासवर्ग .....

प्रत्येक पालक आपल्या बालकास सर्वोत्तम ते मिळावे व त्याचे आयुष्य सर्वांगाने सुखी व समुध्द होण्यासाठी धडपडत असतो. त्याला उत्तम शिक्षण मिळावे यासाठी ते बालकास घरासारखे वातावरण देणारी, उत्तम संस्कार करणारी व त्याच्या उपजत क्षमतांचा विचार करून त्याला आनंददायी ,हसत खेळत,प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान देणारी शाळा ते निवडत असतात.

शिशु शिक्षणासंबंधी अत्यंत सखोल व मूलगामी चिंतन करून विद्याभारतीने शिशुवाटीका या पायाभूत शिक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. ही पध्दत आज देशभरात ३०,००० विद्यालयातून ४० लाख बालकांपर्यंत पोहोचली आहे.

व्यक्तिविकासात मूलगामी निरंतर चालणाऱ्या शिक्षण प्रक्रियेतील आपण संस्थाचालक, मुख्याध्यापक व शिक्षक हे अत्यंत महत्वाचे घटक आहोत. व्यक्तिजीवनातील शिक्षणाचा पाया हा बालकाच्या प्राथमिक शिक्षण काळात प्रभावी होत असतो हे आपण जाणतच आहात.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार सुरवातीचे ३ ते ८ वयोगटातील शिक्षणाच्या टप्प्यास “ पायाभूत शिक्षण ” (Foundational Education) असे म्हटले आहे. यामध्ये शिशुवाटिकेची तीन वर्ष आणि इयत्ता पहिली व दुसरी हे वर्ग येतात.

बदलत्या काळाबरोबर आपली शिक्षण व्यवस्थेतील ध्येय/धोरणही बदलणे आवश्यक आहे. अध्ययन,अध्यापन व मूल्यमापन या त्रिस्तरीय संकल्पनांचा नव्याने विचार आवश्यक वाटू लागला आहे. बदलत्या अभ्याक्रमास यशस्वीपणे सामोरे जाण्याचे आव्हान स्विकारणे ही आपणा सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. आपल्या विद्यालयातील प्राथमिक शिक्षण अधिकाधिक परिपूर्ण व समाधानकारक व्हावे ,वर्गपटसंख्या अधिकाधिक वाढावी यासाठी आपल्या विद्यालयातील वर्ग **बालवाटीका**-१, २, ३ ते इयत्ता पहिली,दुसरी या वर्गांना शिकविणाऱ्या आचार्यांसाठी, संस्थाचालक व या वयोगटातील ज्यांचे पाल्य आहेत अशा पालकांसाठी **पायाभूत शिक्षण** अभ्यास वर्गाचे आयोजन विद्याभारती कोंकण प्रांतातर्फे करण्यात आले आहे. आपणही या वर्गात उपस्थित रहावे आणि इतरांना प्रोत्साहित करावे ही विनंती .

धन्यवाद !

प्रशिक्षण वर्गाचे सुचना पत्रक सोबत जोडले आहे.

**आपले स्नेहांकित**

| | | |
|---|---|---|
| **श्री. संतोष बासाहेब भणगे** | **श्री. सदाशिव सिताराम उपाले** | **श्री. प्रदीप सदाशिव पराडकर** |
| (प्रांतमंत्री) | (महाराष्ट्र-गोवा शिशुवाटिका प्रमुख) | (अध्यक्ष) |
| **सौ.भावना भालचंद्र गवळी** | | **सौ. पल्लवी उमेश आपटे** |
| (प्रांत शिशुवाटिका प्रमुख) | | (प्रांत शिशुवाटिका सहप्रमुख) |

# विद्याभारती, कोंकण मुंबई

(नोंदणी क्र. : महा. राज्य. मुंबई १११७/ २००६ जी.बी.बी.एस.डी.)

द्वारा: राष्ट्रीय शिक्षण व संशोधन संस्था, यशवंत भवन, पांडूरंग बुधकर मार्ग, परळ, मुंबई – ४०० ०१३.

संपर्क पत्ता: प्लॉट क्र. २४५, वसंतश्री अपार्टमेंट, कानसई विभाग, एएमपी गेट जवळ, अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१.

ई-मेल : vidyabhartikokanmumbai@gmial.com / vbkmumbai20@gmail.com

Pan No.: AABTV01975

---

**कालावधी** -- वैशाख शु. पौर्णिमा अर्थात **शुक्रवार दि. ०१ मे २०२६**. ते वैशाख कृ. नवमी अर्थात **सोमवार दि. ११ मे २०२६** पर्यंत.

**टीप**- वर्गास निवासी येणा-यांनी ०१ मे २०२६ रोजी सायंकाळी ४.०० पर्यंत वर्गस्थानी उपस्थित राहावे.
वर्गात पूर्णवेळ उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**वर्गस्थान–**

आदरणीय गोपाळकृष्ण सोहनी प्राथमिक विद्यामंदीर, दापोली, नर्सरी रोड,टेलिफोन एक्सेंज समोर, ता. दापोली, जि. रत्नागिरी-415712.

लोकेशन लिंक- https://maps.app.goo.gl/WpoCvzVVoRFEzqsE6?g_st=aw

**प्रशिक्षण स्थानासाठी संपर्क ----**

सौ.आर्या ऋषिकेश भागवत – 9637725249 , श्री. मुकेश बामणे - 9405686542/9420527292 , वर्ग निवासी असून त्यात नाश्ता , भोजन , निवास व प्रशिक्षणाची व्यवस्था आहे. आवश्यक सूचनांचे पत्रक सोबत जोडले आहे.

**वर्गशुल्क– रुपये ६०००/- सहा हजार मात्र**

**नाव नोदणीसाठी लिंक वरून फॉर्म भरावा** – https://forms.gle/ngkuvGAd8w87DxwEA

**शुल्क भरण्यासाठी लिंक -https://forms.gle/dzsPur2daoxetjZZ9**

**नोंदणीसाठी संपर्क ---**

- श्री. भाई उपाले - 9423360840
- श्री.विवेक पुराणिक -9819914862
- सौ. भावना गवळी (ठाणे ,मुंबई, रायगड) - 9960827538
- सौ. छाया मुसळे (चिपळुण, रत्नागिरी) – 9403144035
- डॉ. सौ. मेधा फणसळकर (सिंधुदुर्ग) – 9423019961
- सौ.पल्लवी आपटे - 7620628997
- सौ.नंदिनी भावे - 8652070701

आपला

| | |
|---|---|
| संतोष बाळासाहेब भणगे | प्रदीप सदाशिव पराडकर |
| **( प्रांतमंत्री )** | **( अध्यक्ष** |

# विद्याभारती, कोंकण मुंबई

(नोंदणी क्र. : महा. राज्य. मुंबई १११७/ २००६ जी.बी.बी.एस.डी.)

**द्वारा:** राष्ट्रीय शिक्षण व संशोधन संस्था, यशवंत भवन, पांडूरंग बुधकर मार्ग, परळ, मुंबई - ४०० ०१३.

**संपर्क पत्ता:** प्लॉट क्र. २४५, वसंतश्री अपार्टमेंट, कानसई विभाग, एएमपी गेट जवळ, अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१.

**ई-मेल :** vidyabhartikokanmumbai@gmial.com / vbkmumbai20@gmail.com

**Pan No.:** AABTV01975

---

### प्रशिक्षण वर्गास उपस्थित राहणाऱ्यासाठी सूचना ...

प्रशिक्षण वर्गात पहाटे उठण्यापासून ते रात्री झोपेपर्यंतचे सर्व कार्यक्रम तसेच जेवण्या - झोपण्याची सोय एखाद्या शिबिराप्रमाणेच असते. वर्गातील सर्व कामे उदा. वर्ग स्थानाची स्वच्छता राखणे, त्याचे सुशोभन करणे , चहा, नाश्ता, भोजन वाढणे इत्यादी प्रशिक्षणार्थीच स्वयंसेवी पद्धतीने करतात. वर्ग यशस्वी होण्यासाठी काही सूचनांचे पालन करणे आवश्यक असते. अशा सर्व सूचना येथे देणे शक्य नसले, तरी काही सामान्य सूचना खाली देत आहोत...

### वर्गास येताना पुढील साहित्य / वस्तू सोबत आणावे....

1. **गणवेश** -पुरुषांसाठी- पांढरा सदरा-पायजमा, अन्य वेळेत साधे कपडे.
   महिलांसाठी- पांढरी साडी व योगाभ्यासासाठी पांढरी सलवार – कमीज,
   अन्य वेळेत साधे कपडे(तंग कपडे/जीन पॅंट नसावेत)
2. लेखन साहित्य – वही, पेन, पेन्सिल, रबर, पट्टी , स्केचपेन , रंगीत खडू, इ.
3. दिवसभर वर्ग स्थानी राहण्याच्या दृष्टीने लागणा-या नित्योपयोगी वस्तू उदा. स्वतःचे कपडे , पांघरुण, **ताट-वाटी-भांडे(पेला)**, तेल , साबण, कंगवा, आरसा, विजेरी, स्वतःसाठी लागणारी रोजची औषधे.

### हे करु नये....

1. वर्गात मौल्यवान वस्तू आणणे.
2. मुलांना सोबत आणणे.
3. शारीरिक व मानसिक स्वास्थ उत्तम नसताना वर्गात सहभागी होणे.
4. गर्भवती असूनही वर्गात सहभागी होणे.
5. वर्गकाळात वर्गस्थान सोडून बाहेर जाण्याची अनुमती मागणे.
6. वर्गास उशिरा सहभागी होण्याचा प्रयत्न करणे.

### हे अवश्य करावे....

1. वर्गात दिल्या जाणाऱ्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे.
2. वर्गाहून परत जाण्याचे आरक्षण वर्गात येण्यापूर्वीच करून यावे.
3. आपण वर्गात सहभागी होत असल्याची सूचना उपरोल्लेखित कोणत्याही एका संपर्क व्यक्तिला भ्रमणध्वनिद्वारे शीघ्रतिशीघ्र देणे. दिनांक २५ एप्रिल २०२६ पर्यंत ही सूचना मिळणे अपेक्षित आहे.
4. वर्गापूर्वीच गुगल फॉर्म भरतानाच दिलेल्या बँक खात्यावर ऑनलाईन शुल्क जमा करावे,
5. दिलेल्या कालावधीमध्ये जर काही कारणामुळे गैरहजेरी झाल्यास प्रमाणपत्र देता येणार नाही,याची नोंद घ्यावी.